**<u>समरी केस क्र. ३६६/२०२३</u>**

**<u>फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (१९७४ चा अधिनियम दोन) प्रकरण एकवीस अन्वये गुन्हयाचे विवरण एम. एस. पठारे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात</u>**

| | | |
|---|---|---|
| १ | अपराध घडल्याचा दिनांक | : ०९.०७ .२०२३ |
| २ | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : १०.०७.२०२३ |
| ३ | फिर्यादीचे नांव | : **सरकारतर्फे माणगांव पोलीस ठाणे** |
| ४ | आरोपीचे नांव | : **मोहन बाबु खाडे** |
| | वय | : ३९ वर्षे, |
| | राहणार | : रा. होडगांव, ता. माणगांव, जि. रायगड. |
| ५ | गुन्हयाचे विवरण | : |

दिनांक ०९.०७.२०२३ रोजी १७.०० वाजताचे सुमारास मौजे निजामपुर बाजारपेठे ता. माणगांव येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील रिक्षा क्रमांक एम एच <u>०६</u> बी. व्ही. १५२५ हे वाहन सार्वजनिक रोडवर येणा-या जाणा-या लोकांचे जिवितास धोका निर्माण होईल अशा रितीने रोडवर उभे करून वाहतुकीस अडथळा निर्माण केला म्हणून तुम्ही भा. द. वि. कलम २८३ अन्वये गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये केला.

माणगांव (एस. एस. पठारे)
दिनांक : ०३.०८.२०२३ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव

प्रश्न १ : तुम्हाला पोलीस टिपणाच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर: होय.

प्रश्न २ : तुमच्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप तुम्हाला वाचुन दाखवला तो तुम्हाला समजला काय?

उत्तर: होय.

प्रश्न ३ :    तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय?

उत्तर :    होय.

....................................

आरोपीची सही / अंगठा

माणगांव                                                (एम. एस. पठारे)
दिनांक : ०३.०८.२०२३                प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव

## न्या य नि र्ण य

सदर आरोपीविरूध्द भारतीय दंड संहिता कलम २८३ खालील आरोपाबाबत प्रकरण दाखल केलेले आहे. आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबुल करून तसा लेखी अर्ज दाखल करून दया दाखविणेस विनंती केली आहे. आरोपीचे म्हणणे ऐकले. आरोपीचा पहिलाच गुन्हा असल्याचे कागदपत्रावरून स्पष्ट होते. तसेच तो त्याचे कुटुंबातील एकमेव कर्ता /कमवता इसम असल्यामुळे खालील शिक्षा न्याय होईल. करिता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आ दे श

आरोपी **मोहन बाबु खाडे** यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये भारतीय दंड संहिता कलम **२८३** चे गुन्हयाकरिता दोषी धरून सदर गुन्हयाबद्दल आरोपीला एकुण **रक्कम रूपये २००/- (अक्षरी दोनशे मात्र)** द्रव्यदंड ठोठावण्यात येत आहे. आरोपीने सदर दंडांची रक्कम न भरल्यास ०२ दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा भोगावयाची आहे.

माणगांव                                                (एम. एस. पठारे)
दिनांक : ०३.०८.२०२३                प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माणगांव